

Postal Registration No-SRP/127/2024-26 | RNI No. MAH/MAR/2015/74917 | dainikpravarateer01@gmail.com | 9970 96 6399

सायं. दैनिक

प्रवरातीर

प्रवरा पब्लिकेशन

विकासाचा पुरस्कार - अन्यायाचा तिरस्कार

मुख्य संपादक : शिवपालसिंह प्र. ठाकुर | 9372013375 | संपादक : धिरजसिंह शिवपालसिंह प्र. ठाकुर | 9970968399

पॅनल देणे आहे

वर्ष ११ वे | अंक ३२१ वा | पाने ४ | किंमत २ रु. | संगमनेर - अकोले - कोपरगाव - रहाता - राहुरी | वार रविवार दिनांक ०८ नोव्हेंबर २०२६



फराळ, फटाके
जिकडे तिकडे.
दिवाळी म्हणजे
राजेन्द्रचे कपडे

१९५९ पासून
राजेन्द्र
क्लॉथ स्टोअर्स

मेन रोड, संगमनेर.
फोन : 02425-225740,
79010 31155



संगमनेरात 7 लाख 68 हजाराच्या गुटख्यासह 14 लाखाचा मुद्देमाल जप्त

प्रवरातीर | वृतसेवा

संगमनेर प्रतिनिधी

नाशिक-पुणे महामार्गावरील बोटा शिवारातील माळवाडी येथील साकूर ड्रायव्हर ढाब्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने छापा टाकून प्रतिबंधित विमल गुटखा आणि सुगंधित तंबाखूचा मोठा साठा जप्त केला. या कारवाईत पोलिसांनी ७ लाख ६८ हजार ८०० रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा व तंबाखू तसेच वाहतुकीसाठी



वापरण्यात आलेला सुपर कॅरी टेम्पो असा एकूण १४ लाख ९३ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या प्रकरणी एका संशयिताला ताब्यात घेण्यात आले असून, गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मनोज बाजीराव पाटील (वय ४०, रा. पंचवटी, नाशिक) असे ताब्यात घेण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत साकूर ड्रायव्हर ढाब्याच्या मागील बाजूस प्रतिबंधित गुटख्याचा साठा असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे (पान ०२ वर...)



'तुमचे नगरसेवक टक्केवारी वसूल करतात'

प्रवरातीर | वृतसेवा

संगमनेर प्रतिनिधी

संगमनेर नगरपालिका निवडणुकीत यश मिळाले म्हणून विरोधकांनी हुरळून जाऊ नये. तुमचे नगरसेवक टक्केवारी वसूल करण्याचे काम करतात, तर आमचे कार्यकर्ते नगरसेवक नसतानाही



जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी रस्त्यावर उतरून जनसेवक म्हणून (पान ०२ वर...)



काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वामुळे फुलली संगमनेरची बाजारपेठ!

प्रवरातीर | वृतसेवा

संगमनेर प्रतिनिधी

अहमदनगर जिल्ह्यातील सर्वात मोठी आणि समृद्ध बाजारपेठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संगमनेर शहरातील बाजारपेठ यंदा दिवाळीनिमित्त पुन्हा एकदा गजबजली आहे. काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखालील अमृत उद्योग समूह आणि तालुक्यातील संलग्न सहकारी संस्थांच्या माध्यमातून सुमारे १६० कोटी रुपयांहून अधिक रक्कम बाजारात आल्याने शहरातील व्यापाराला मोठी चालना मिळाली आहे. यामुळे



व्यापारी वर्गासह नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

संगमनेर शहर हे जिल्हा आणि राज्यातील सुसंस्कृत, शांत, सुरक्षित तसेच विकासाच्या वाटेवर असलेले शहर म्हणून ओळखले जाते. गतिमान नेतृत्व, सक्षम सहकार, शैक्षणिक प्रगती आणि सामाजिक सलोखा यामुळे संगमनेरने विकासाच्या क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. मात्र, मागील दोन वर्षांपासून शहरात निर्माण झालेली अस्थिरता आणि अस्वस्थतेचा परिणाम बाजारपेठेवर झाला होता. बाहेरील तालुक्यांतील नागरिकांचा संगमनेरकडे खरेदीसाठी येण्याचा कल काही प्रमाणात कमी झाल्याने व्यापारी वर्गात चिंतेचे वातावरण होते.

दरम्यान, दीपावलीच्या पार्श्वभूमीवर अमृत उद्योग समूहासह तालुक्यातील विविध सहकारी संस्थांमधून मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार झाले. सहकारमहर्षी (पान ०२ वर...)



संगमनेरात 7 लाख 68 हजाराच्या गुटख्यासह 14 लाखाचा मुद्देमाल जप्त

एलसीबीच्या पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी तेथे उभ्या असलेल्या सुपर कॅरी टेम्पोची तपासणी केली असता, त्यामध्ये पानमसाला आणि सुगंधित तंबाखूच्या गोण्या आढळून आल्या. पोलिसांनी हा संपूर्ण साठा जप्त केला. जप्त केलेल्या मालाची छापील किंमत सुमारे ७ लाख रुपये असल्याची माहिती समोर आली आहे.

चौकशीदरम्यान मनोज पाटील याने हा माल घारगाव येथील युसूफ दादा चौगुले आणि जब्बार दादा चौगुले यांना विक्री करण्यासाठी आणल्याची माहिती पोलिसांना दिली. तसेच हा माल नाशिक आणि वापी येथील वैभव मोराडे, सुनील अमृतकर, धीरज माळी आणि कमलेश माळी यांच्याकडून आणल्याचेही त्याने सांगितले.

या प्रकरणी संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, प्रतिबंधित गुटख्याच्या पुरवठा साखळीचा शोध घेण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सुभाष बोडखे करीत आहेत. या कारवाईमुळे परिसरातील प्रतिबंधित गुटखा विक्री आणि वाहतुकीच्या प्रकारांना आळा घालण्याच्या दृष्टीने पोलिसांनी महत्त्वाची कारवाई केल्याचे मानले जात आहे.

दरम्यान, या प्रकरणातील आर्थिक व्यवहार आणि मालाच्या खरेदी-विक्रीचे धागेदोरे तपासून संबंधितांवर पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.





'तुमचे नगरसेवक टक्केवारी वसूल करतात'

काम करतात, असा थेट आरोप आमदार अमोल खताळ यांनी केला. दिवाळीनंतर राजकारणाचे डावपेच कसे खेळायचे असतात, हे दाखवून देऊ, असा इशाराही त्यांनी विरोधकांना दिला. त्यांच्या या वक्तव्यामुळे संगमनेरमधील राजकीय वातावरण पुन्हा तापण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

संगमनेर शहरातील अकोले नाका परिसरात शिवसेनेच्या शिव वाहतूक सेनेचे उद्घाटन आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर शिवसेनेचे शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी, नगरसेविका साक्षी सूर्यवंशी यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना खताळ यांनी विरोधकांना लक्ष्य केले. मला राजकारण कळत नाही, असा काहींचा समज असेल तर त्यांनी तो मनातून काढून टाकावा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली आहे. त्यामुळे मला राजकारण शिकवण्याच्या फंदात कोणी पडू नये. दिवाळीनंतर राजकीय डावपेच काय असतात, हे दाखवून देऊ, असे त्यांनी स्पष्ट केले.

शहरातील सर्वसामान्य नागरिक, व्यापारी आणि व्यावसायिकांना कोणी धमकावण्याचा प्रयत्न करत असेल, तर ते अजिबात खपवून घेतले जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. नगरपालिकेचे कॉटेज रुग्णालय बंद पाडल्याचा आरोप करताना, नातेवाईकांचे दवाखाने सुरू राहावेत म्हणून हा प्रकार करण्यात आल्याचे त्यांनी म्हटले. घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयात महिलांसाठी आणि लहान मुलांसाठी १०० खाटांचे स्वतंत्र रुग्णालय सुरू करण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला. यासाठी लवकरच आरोग्यमंत्री संगमनेरमध्ये येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शिवसेनेच्या माध्यमातून रिक्षाचालकांना संघटित करून त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी शिव वाहतूक सेना कार्यरत राहणार असल्याचे खताळ यांनी सांगितले.महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी बचतगटांच्या माध्यमातून उपक्रम राबविणे तसेच गरजू महिलांना शिलाई यंत्रे उपलब्ध करून देण्याचाही प्रयत्न केला जाणार आहे.

संगमनेर शहर आणि तालुक्यातील प्रत्येक गावात शाखा सुरू करून 'गाव तेथे शाखा आणि घर तेथे शिवसैनिक' हा उपक्रम राबविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. आगामी निवडणुका लोकशाही मार्गाने लढविल्या जातील आणि सामान्य शिवसैनिकालाही निवडणुकीच्या मैदानात उतरविले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे दिवाळीनंतर संगमनेरच्या राजकारणात कोणते नवे डावपेच पाहायला मिळतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांना जनतेच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचे आवाहन केले. संघटन मजबूत करून आगामी काळात पक्षाची ताकद वाढविण्यावरही भर दिला.





काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वामुळे फुलली संगमनेरची बाजारपेठ!

भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून २२ कोटी रुपये, राजहंस दूध संघातून ५० कोटी रुपये, तर दूध संघाशी संलग्न गावांमधील दूध सोसायट्यांमधून सुमारे ५५ कोटी रुपये बाजारात आले. याशिवाय अमृतवाहिनी कॉलेज, अमृतवाहिनी बँक, शेतकी संघ, सह्याद्री, राजहंस कंपनी तसेच तालुक्यातील विविध सेवा सोसायट्या, दूध संस्था, शैक्षणिक संस्था, बँका आणि पतसंस्थांच्या माध्यमातूनही मोठी आर्थिक उलाढाल झाली. या सर्व माध्यमांतून सुमारे १६० कोटी रुपयांहून अधिक रक्कम बाजारपेठेत आल्याचे सांगण्यात आले.

शेतकऱ्यांना लाभांश, उसाचे अनुदान, कामगारांना बोनस तसेच दूध रेबिटचे वाटप करण्यात आल्याने ग्रामीण भागातील नागरिकांच्या हातात पैसा आला आहे. त्यामुळे त्याचा थेट परिणाम संगमनेरच्या बाजारपेठेवर दिसून येत आहे. शहरातील मेन रोड, नवीन नगर रोड, बाजारपेठ आणि नाशिक रोड परिसरातील कपड्यांची दुकाने, सराफ बाजार, मिठाईची दुकाने, गृहपयोगी वस्तू, फटाके आणि रोषणाईच्या साहित्याच्या दुकानांमध्ये खरेदीसाठी मोठी गर्दी होत आहे.

म्हणूनच संगमनेरच्या बाजारपेठेत यंदा दिवाळीचा उत्साह विशेषत्वाने जाणवत आहे. ग्रामीण भागातील महिला, नागरिक आणि लहान मुले मोठ्या संख्येने खरेदीसाठी शहरात दाखल होत आहेत. आजूबाजूच्या तालुक्यांतील ग्राहकही संगमनेरला पसंती देत असल्याचे चित्र आहे. काही दुकानांमध्ये ग्राहकांची गर्दी इतकी वाढली आहे की खरेदीसाठी ग्राहकांना प्रतीक्षा करावी लागत आहे. दुकानदारांनाही वाढत्या गर्दीमुळे समाधान व्यक्त होत आहे.

संगमनेर तालुक्यात दूध व्यवसाय आणि सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत झाली असून शेतकऱ्यांच्या हातात आलेला पैसा पुन्हा बाजारपेठेत फिरत आहे. सहकारातून निर्माण झालेली ही आर्थिक उलाढाल शहर आणि ग्रामीण भागातील व्यापाराला आधार देत आहे. बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली उभ्या राहिलेल्या सहकारी संस्थांच्या आर्थिक व्यवहारांचा दिवाळीच्या बाजारपेठेवर झालेला परिणाम यंदाच्या गर्दीतून स्पष्टपणे दिसून येत आहे. त्यामुळे संगमनेर शहर आणि तालुक्यात दिवाळीचा उत्साह सर्वत्र अनुभवायला मिळत आहे.

— राजेंद्र सोमानी



ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या प्रकृतीची बाळासाहेब थोरात यांनी रुग्णालयात जाऊन घेतली आस्थेवाईक विचारपूस

प्रवरातीर | वृतसेवा
संगमनेर प्रतिनिधी

देशाच्या राजकारणातील ज्येष्ठ नेते तथा खासदार शरदचंद्रजी पवार हे सध्या मुंबई येथील ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार घेत आहेत. त्यांच्या प्रकृतीची आस्थेवाईक विचारपूस करण्यासाठी महाराष्ट्राचे माजी महसूल व कृषिमंत्री, काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा काँग्रेस राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य बाळासाहेब थोरात यांनी आज रुग्णालयात जाऊन त्यांची भेट घेतली. यावेळी थोरात यांनी पवार साहेबांच्या तब्येतीची सविस्तर चौकशी करत त्यांना लवकरात लवकर उत्तम आरोग्य लाभावे आणि ते पुन्हा पूर्ण क्षमतेने जनसेवेच्या कार्यात रुजू व्हावेत, अशा सदिच्छा व्यक्त केल्या.

मागील दोन दिवसांपासून खासदार शरदचंद्रजी पवार हे मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार घेत आहेत. त्यांच्या प्रकृतीची माहिती समजल्यानंतर राज्यभरातील विविध राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी रुग्णालयात जाऊन त्यांची भेट घेतली असून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली आहे. पवार साहेबांच्या प्रकृतीबाबत महाराष्ट्रातील जनतेमध्येही काळजी आणि आपुलकीची भावना व्यक्त होत आहे.



दरम्यान, बाळासाहेब थोरात यांनी काल नाशिक येथे उत्तर महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बैठकीत सहभाग घेतला. ही बैठक पूर्ण केल्यानंतर त्यांनी मुंबईकडे प्रयाण केले. आज दुपारी त्यांनी ब्रीच कँडी रुग्णालयात जाऊन शरदचंद्रजी पवार यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी पवार साहेबांशी संवाद साधत त्यांच्या प्रकृतीची आपुलकीने विचारपूस केली. तसेच त्यांच्या लवकर प्रकृतीसुधारणेसाठी शुभेच्छा दिल्या.








जयश्रीताई थोरात यांनी घेतले एकविरा देवीचे दर्शन

प्रवरातीर | वृतसेवा
संगमनेर प्रतिनिधी

दीपावलीच्या मंगलमय पर्वाच्या पार्श्वभूमीवर सर्वांच्या जीवनात सुख, समाधान आणि आनंद नांदू दे, अशी प्रार्थना संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात यांनी लोणावळा येथील कार्ला गडावरील आई एकविरा देवीच्या चरणी केली.

लोणावळा येथे युवक काँग्रेसच्या चिंतन शिबिरानंतर डॉ.जयश्रीताई थोरात यांनी एकविरा देवीचे दर्शन घेतले. यावेळी लोणावळ्याचे माजी नगराध्यक्ष राजू गवळी, नगरसेवक निखिल कविस्वर, नवनाथ शिंदे, शेखर भाऊ मालपुरे, संकेत शिंदे, सचिन शिंदे, आदित्य पाळेकर, किरण शिंदे, शिल्पा गुंजाळ, राजेंद्र सोनवणे, नगरसेवक मुकेश परमार आणि नगरसेवक अनिल गवळी उपस्थित होते. याप्रसंगी एकविरा देवस्थानच्या वतीने डॉ.जयश्रीताई थोरात यांचा सत्कार करण्यात आला.



यावेळी बोलताना डॉ.जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, सध्या समाजामध्ये वाढत असलेली अस्वस्थता आणि सामाजिक तणाव ही चिंतेची बाब आहे. दीपावली हा आनंद, मांगल्य आणि सकारात्मकतेचा संदेश देणारा सण आहे. या मंगलमय पर्वात प्रत्येकाच्या जीवनात सुख, समाधान आणि आनंद निर्माण व्हावा, समाजात शांतता, सलोखा आणि बंधुभाव वाढावा, अशी प्रार्थना आपण आई एकविरा देवीकडे केली आहे.

त्या पुढे म्हणाल्या की, आजच्या धावपळीच्या जीवनात प्रत्येकाने स्वतःच्या आरोग्याला प्राधान्य दिले पाहिजे. आरोग्य हेच खरे धन असून त्याचे जतन करणे आवश्यक आहे. सध्या विविध आजारांचे वाढते प्रमाण हा समाजाच्या चिंतनाचा विषय आहे. यासाठी सेवाभावी संस्था आणि राजकीय पक्षांनीही आरोग्यविषयक जनजागृती व प्रबोधनासाठी पुढाकार घेतला पाहिजे. विशेषतः महिलांनी स्वतःच्या आरोग्याबाबत अधिक सतर्क राहावे. महिला निरोगी असतील तर संपूर्ण कुटुंब निरोगी राहते. त्यामुळे महिलांनी कुटुंबाची काळजी घेतानाच स्वतःच्या आरोग्याकडेही लक्ष द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी माजी नगराध्यक्ष राजू गवळी म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात हे महाराष्ट्रातील पुरोगामी आणि संतविचारांचा वारसा जपणारे नेतृत्व आहे. पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन त्यांच्या नेतृत्वाचा सर्व समाजात आणि राज्यातील विविध जिल्ह्यांत आदर केला जातो. डॉ.जयश्रीताई थोरात यांनीही त्यांचा सामाजिक आणि वैचारिक वारसा समर्थपणे पुढे चालवला आहे.







ऐन दिवाळीच्या तोंडावर पीएम किसानचे पैसे खात्यातून कापले!

प्रवरातीर | वृतसेवा

संगमनेर प्रतिनिधी

ऐन दिवाळीच्या तोंडावर पीएम किसानचे पैसे खात्यातून कापले! संगमनेर, दि. ६ (सा. वा.) : दिवाळीचा सण अवघ्या काही दिवसांवर आलेला असताना आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाकडून मिळणारा पीएम किसान योजनेचा हप्ता मोठा आधार ठरतो. मात्र, संगमनेर परिसरातील एका शेतकऱ्याच्या खात्यात जमा झालेली पीएम किसान योजनेची रक्कम कर्जाच्या व्याजापोटी कपात झाल्याचा प्रकार समोर आला आहे. पंजाब नॅशनल बँकेच्या या कथित प्रकारामुळे शेतकरी वर्गातून नाराजी व्यक्त होत आहे.









विष्णू वैराळ यांनी याबाबत आपली तक्रार मांडली आहे. दिवाळीच्या सणासाठी घरातील किराणा, कपडे, फराळ आणि इतर आवश्यक खर्च भागविण्यासाठी पीएम किसान योजनेतून मिळणाऱ्या पैशांची अपेक्षा होती. आर्थिक अडचणीच्या काळात शासनाकडून मिळणारी ही मदत उपयोगी पडणार होती. मात्र, खात्यात पैसे जमा झाल्यानंतर कर्जाच्या व्याजापोटी ही रक्कम कपात झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

सणासुदीच्या काळात शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा, या उद्देशाने शासनाकडून विविध योजनांच्या माध्यमातून मदत दिली जाते. मात्र, हीच रक्कम बँकेकडून कपात झाल्याचा आरोप झाल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. आधीच शेतीतील खर्च, कमी उत्पन्न आणि वाढत्या महागाईमुळे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना दिवाळीच्या तोंडावर अशा प्रकाराला सामोरे जावे लागत असल्याने नाराजी वाढली आहे.

दरम्यान, याबाबत पंजाब नॅशनल बँकेचे मस्कू खामगल यांनी स्पष्टीकरण दिले आहे. पीएम किसान योजनेची रक्कम किंवा शेतकऱ्यांचे पैसे अशा प्रकारे अचानक कपात होत नाहीत. याबाबतची तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दोन दिवसांत संबंधित रक्कम पुन्हा खात्यात जमा होईल, असे त्यांनी सांगितले.

मात्र, दिवाळीच्या तोंडावर शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेल्या पैशांबाबत निर्माण झालेल्या या प्रकारामुळे बँकिंग प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. संबंधित शेतकऱ्याच्या खात्यात कपात झालेली रक्कम प्रत्यक्षात कधी जमा होते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

कर्तव्यात कसूर; महिला अभियंता सक्तीच्या रजेवर!

प्रवरातीर | वृतसेवा

संगमनेर प्रतिनिधी

संगमनेर विधानसभा मतदारसंघातील पाणीटंचाईच्या प्रश्नावर झालेल्या आढावा बैठकीत प्रशासकीय कामकाजातील त्रुटी समोर आल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या उपअभियंता (स्थापत्य) शैलजा थिटे यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. कर्तव्यात कसूर आणि अकार्यक्षमतेचा ठपका ठेवत त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्याचे आदेश देण्यात आले असून, विभागीय चौकशीचाही प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

७ ऑक्टोबर २०२६ रोजी पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली संगमनेर विधानसभा मतदारसंघातील पाणीटंचाईचा आढावा घेण्यासाठी बैठक झाली होती. यावेळी पाणीपुरवठ्याची स्थिती, उपाययोजना आणि प्रशासकीय कामकाजाचा आढावा घेण्यात आला. बैठकीत शैलजा थिटे यांच्या कार्यपद्धतीबाबत नाराजी व्यक्त करून कारवाईचे निर्देश देण्यात आले.

त्यानंतर मुख्य अभियंता, नाशिक यांनी २२ ऑक्टोबर रोजी विभागीय चौकशीचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मध्यवर्ती कार्यालयाकडे पाठविला. या कारवाईमुळे प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, चौकशीचा निष्कर्ष आणि पुढील कारवाईकडे संगमनेरकरांचे लक्ष लागले आहे.

दीपावली हे आनंदाचे पर्व ; पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करा – मा.मंत्री बाळासाहेब थोरात

प्रवरातीर | वृतसेवा

संगमनेर प्रतिनिधी



भारतीय संस्कृतीत दीपावली या सणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. घराघरांत प्रज्वलित होणाऱ्या पणत्या अंधार दूर करून प्रत्येकाच्या जीवनात आनंदाचा प्रकाश निर्माण करतात. वर्षभर कष्ट करणाऱ्या प्रत्येकाला दीपावलीच्या माध्यमातून आनंदाचे क्षण अनुभवता यावेत, सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी आणि समाधान नांदावे, अशी सदिच्छा व्यक्त करत सर्वांनी पर्यावरणपूरक दिवाळी आनंदाने साजरी करावी, असे आवाहन काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य तथा माजी महसूलमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी केले.दीपावलीनिमित्त सुदर्शन निवासस्थानी त्यांनी कार्यकर्ते, युवक आणि नागरिकांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, डॉ.जयश्रीताई थोरात यांच्यासह संगमनेर शहरातील कार्यकर्ते व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बाळासाहेब थोरात म्हणाले की, भारतीय संस्कृतीत दीपोत्सव म्हणून साजरा होणाऱ्या दीपावलीमध्ये लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वजण उत्साहाने सहभागी होतात. हा सण आनंद, मांगल्य आणि एकोप्याचा संदेश देणारा आहे. वर्षभर प्रत्येक जण कष्ट करतो, विविध अडचणींवर मात करतो. त्यामुळे सण - उत्सव हे जीवनातील आनंद द्विगुणित करण्याचे पर्व असतात. वसुबारस ते भाऊबीज असा हा दीपावलीचा कालावधी कुटुंबीयांना एकत्र आणणारा आणि नात्यांमधील स्नेह अधिक दृढ करणारा आहे.

यावर्षी राज्यात कमी पाऊस झाल्यामुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून शेतकरी अडचणीत आहेत. मात्र, या परिस्थितीतही सर्वांनी चार दिवस आनंदाने आणि एकोप्याने दिवाळी साजरी करावी. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येत आनंदाचे वातावरण निर्माण करावे. त्याचबरोबर पर्यावरणाचे संरक्षण, प्रदूषण टाळणे आणि आरोग्याची काळजी घेणे यासाठी पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करावी, असे आवाहन त्यांनी केले.

आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली अमृत उद्योग समूहातील विविध सहकारी संस्था व संलग्न संस्थांच्या माध्यमातून उत्पादक, शेतकरी, सभासद, कामगार आणि वाहतूकदार अशा विविध घटकांना दिवाळीनिमित्त आर्थिक सहकार्य मिळाले आहे. सहकाराच्या माध्यमातून सुमारे १६० कोटी रुपये बाजारपेठेत आल्याने संगमनेरची बाजारपेठ फुलली आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेला सहकार शहराच्या आर्थिक समृद्धीत महत्त्वाची भूमिका बजावत असून सर्वांनी आनंदाने दिवाळी साजरी करावी, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

डॉ. जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, भारतीय संस्कृतीत दीपावलीला विशेष महत्त्व असून या सणाच्या निमित्ताने कुटुंबातील सर्व सदस्य एकत्र येतात. कुटुंबातील नातेसंबंध अधिक दृढ करणारा आणि जीवनात आनंद निर्माण करणारा हा पारंपरिक सण आहे. प्रत्येकाने दिवाळी साजरी करताना स्वतःच्या तसेच कुटुंबीयांच्या आरोग्याची काळजी घ्यावी. स्वस्थ राहा, मस्त राहा आणि आनंदी राहा, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या.

सहकारामुळे संगमनेर तालुक्यात आर्थिक समृद्धी – बाळासाहेब थोरात



प्रवरातीर | वृतसेवा

संगमनेर प्रतिनिधी

सहकार चळवळीने ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला बळ देण्याचे महत्त्वपूर्ण काम केले आहे. संगमनेर तालुक्यात पतसंस्था आणि दूध संस्थांची एकमेकांना पूरक अशी व्यवस्था निर्माण झाल्याने सहकाराची भक्कम चळवळ उभी राहिली आहे. आज तालुक्यात १३४ पतसंस्था असून, त्यांच्याकडे सुमारे २ हजार ४०० कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. यामध्ये प्रवरा ग्रामीण पतसंस्थेचे योगदानही मोलाचे आहे. सहकारी संस्थांनी भविष्यातही पारदर्शक, काटकसरीचा आणि सभासदांच्या हिताचा कारभार करून सहकार चळवळ अधिक मजबूत करावी, या सहकारी संस्थांमुळे तालुक्यात आर्थिक समृद्धी निर्माण झाले असल्याचे असे प्रतिपादन मा. महसूल व कृषी मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी केले.

धांदरफळ खुर्द येथे प्रवरा ग्रामीण पतसंस्थेच्या स्वमालकीच्या नूतन इमारतीचे उद्घाटन थोरात यांच्या हस्ते उत्साहात झाले. आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी युवक काँग्रेसच्या अध्यक्षा जयश्री थोरात, माधवराव कानवडे, पांडुरंग घुले, तालुका काँग्रेस अध्यक्ष अजय फटांगरे, रामहरी कातोरे, रमेश गुंजाळ, विलास कवडे, विजय राहणे, मारुती कवडे, संपतराव डोंगरे, मुरलीआप्पा खताळ, शरद नाना थोरात आणि ह.भ.प. सुदाम महाराज कोकणे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी मंत्री बाळासाहेबथोरातपुढेम्हणालेकी, १९८९ मध्ये शरद पवार मुख्यमंत्री झाल्यानंतर राज्यात पतसंस्था चळवळीला खऱ्या अर्थाने गती मिळाली. संगमनेर तालुक्यात पतसंस्थांना दूध संस्थांची जोड देण्यात आली. त्यामुळे आर्थिक व्यवहारांसोबतच वसुलीची हमी निर्माण झाली. आज राज्यात सुमारे ३३ हजार पतसंस्था कार्यरत आहेत. संगमनेर तालुक्यातील पतसंस्थांची प्रगती ही येथील सभासद, कार्यकर्ते आणि सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांच्या मेहनतीचे फलित आहे. प्रवरा ग्रामीण पतसंस्थेचे १० कोटी रुपयांचे भागभांडवल असून, संस्थेने स्वतःची नवी वास्तू उभी करणे ही अभिमानाची बाब आहे.

सहकार ज्या ठिकाणी कमकुवत झाला,त्याठिकाणीपतसंस्थांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे. मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून शेतकऱ्यांना होणारा त्रास चिंताजनक आहे. आपण पतसंस्था आणि दूध संस्था चांगल्या पद्धतीने चालवल्या, त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला स्थैर्य मिळाले. तालुक्यातील दूध संघ, कृषी उत्पन्न बाजार समिती आणि अमृतवाहिनी बँक यांसारख्या सहकारी संस्था सक्षमपणे सुरू आहेत. भविष्यात या संस्था आणखी चांगल्या कशा होतील, यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे.







सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
(थोर स्वातंत्र्यसेनानी)

थोर स्वातंत्र्य सैनिक भाऊसाहेब थोरात यांनी संगमनेर तालुक्यात विकासाचा मंत्र घुमवून शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर व कामगार यांच्यासाठी उभारलेली प्रतिसृष्टी


अमृत उद्योग समुह

दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

अथक 65 वर्षांची रचनात्मक वाटचाल

सहकारातील अग्रगण्य संस्था

- सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना लि, अमृतनगर
- संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्यादित, संगमनेर
- अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्था, अमृतनगर
- सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि, अमृतनगर
- सौ. मथुराबाई भाऊसाहेब थोरात सेवाभावी ट्रस्ट
- संगमनेर शेतकी संघ लि,संगमनेर
- संगमनेर ॲग्रीकल्चर प्रोड्युस ट्रान्सपोर्ट कंपनी प्रा. लि, अमृतनगर
- राजहंस ॲग्रीकल्चर ट्रान्सपोर्ट कंपनी प्रा. लि, अमृतनगर
- संगमनेर ता. ॲग्रीकल्चर प्रोड्यूस प्रोसेसिंग मार्केटिंग को-ऑप सोसा. मर्या
- गरुड सहकारी कुक्कुट पालन व्यावसायिक संस्था लि, घुलेवाडी
- सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज, संगमनेर
- हरिश्चंद्र सहकारी पाणी पुरवठा संस्थांचे सहकारी फेडरेशन



लोकनेते
मा.आ. बाळासाहेब थोरात
सदस्य : अखिल भारतीय राष्ट्रीय कांग्रेस वर्किंग कमिटी
मा. महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य/ विधीमंडळ गटनेते

निळवंडे धरण



निळवंडे कालवा















हे सायं. दैनिक प्रकाशक, प्रिंटर्स संपादक श्री. शिवपालसिंह प्रतापसिंह ठाकूर यांनी प्रवरा प्रिंटींग प्रेस, घोडेकर मळा, संगमनेर, ता. संगमनेर, जि.अ.नगर (महाराष्ट्र) येथे छापून याच ठिकाणी कार्यालयात प्रकाशित केले. पी.आर.बी. कायद्यानुसार अंकात प्रसिध्द केलेल्या मजकुराची जबाबदारी यांचेवर राहील. मालक संपादक धिरजसिंह शिवपालसिंह ठाकूर, मो ९९७०९६८३९९ संगमनेर न्यायकक्षेत